सिडको
शहरांचे शिल्पकार

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित**
कार्मिक विभाग
सिडको भवन, २ रा माळा, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
दुरध्वनी क्रमांक: ०२२-६७९१८२५१ ईमेल: mp@cidcoindia.com

सिडको/कार्मिक/भरती/२०२३/ E- 212733 दिनांक: २६.०५.२०२३

## <u>कार्यालयीन आदेश</u>

संदर्भ: १) कार्यालयीन आदेश क्र. CIDCO/Personnel /RCT/२०२३/E- २०२९७५
२) कार्यालयीन आदेश क्र. CIDCO/Personnel /RCT/२०२३/E- २०२९७७
३) कार्यालयीन आदेश क्र. CIDCO/Personnel /RCT/२०२३/E- २०२९८२

वरील दि. २१.०४.२०२३ रोजीच्या संदर्भीय कार्यालयीन आदेशांनुसार महामंडळातील विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची बदली/ पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आलेली आहे.

तथापि, असे निर्दशनास आले आहे की, बदली आदेश प्राप्त होऊनही बदली झालेले काही अधिकारी/कर्मचारी बदली झालेल्या विभागात आजतागायत रुजू झालेले नाहीत.

तरी अशा अधिकारी/कर्मचारी यांना या कार्यालयीन आदेशाद्वारे **तात्काळ कार्यमुक्त** करण्यात येत आहे ( नवीन शहरे कार्यालयातून नवी मुंबई कार्यालयात बदली झालेले अधिकारी/कर्मचारी वगळून). संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी दि. २९.०५.२०२३ पर्यंत बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन दि. ३०.०५.२०२३ पर्यंत रूजू अहवाल संबंधीत विभागप्रमुखांच्या स्वाक्षरीने कार्मिक विभागास सादर करावा. दि. २९.०५.२०२३ रोजी बदलीच्या/पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू न होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर सिडको सेवा विनियमाच्या प्रकरण ४ मधील २५(३९) नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. . संबंधित अधिकारी/कर्मचारी दि. २८.०५.२०२३ नंतर बदलीपूर्वीच्या ठिकाणी कार्यरत राहणार नाहीत, याची संबंधीत विभागप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

त्याचप्रमाणे ज्या महिला अधिकारी/कर्मचारी प्रसुती अथवा बालसंगोपन रजेवर असतील त्यांनी रजेवरुन रुजू झाल्यानंतर बदलीच्या ठिकाणी हजर व्हावे.

26/05/23
**(फैयाज खान)**
**व्यवस्थापक (कार्मिक)**

**प्रत: माहितीस्तव सविनय सादर**

१. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक
२. मा. सह-व्यवस्थापकीय संचालक-१
३. मा. सह-व्यवस्थापकीय संचालक-२
४. मा. सह-व्यवस्थापकीय संचालक-३
५. मा. मुख्य प्रशासक, नवीन शहरे
६. मा. मुख्य दक्षता अधिकारी
७. सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख
८. व्यवस्थापक (प्रणाली) - इंट्रानेटवर प्रसिध्दीकरीता
९. सूचना फलक- सिडको भवन, रायगड भवन व सर्व विभागीय कार्यालये